# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.३३ दिनांक ०५/०४/२०२१

## पालघर पोलीस दलाकडुन, पालघर पोलीस ठाणेमार्फत रक्तदान शिबीराचे आयोजन

संपुर्ण महाराष्ट्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव प्रचंड वाढलेला आहे. कोव्हीड -१९ मुळे राज्यभरात रक्ताचा तुटवडा निर्माण झालेला आहे. त्याअनुषंगाने मा.श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.शैलेश काळे, पोलीस उपअधीक्षक गृह,पालघर, श्री. विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पालघर पोलीस ठाण्यातर्फे लायन्स क्लब पालघर येथे पालघर पोलीस दल यांच्या विद्यमाने, पतंगशहा कुटीर रुग्णालय रक्तपेढी जव्हार जिल्हा पालघर व जे.जे. हॉस्पीटल रक्तपेढी, मुंबई या शासकीय रक्तपेढीच्या वतीने सकाळी १०.०० ते १८.३० वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

पालघर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री.दशरथ पाटील यांनी पोलीस ठाणे परिसरातील पोलीस मित्र, ग्रामरक्षक दल, सागर रक्षक दल व नागरींकांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करुन नागरीकांना रक्तदानाचे महत्व पटवुन दिले होते. त्यामुळे दिनांक ०४/०४/२०२१ रोजी पालघर पोलीस ठाणे परीसरातील तरुण वर्ग व महीलांनी मोठया प्रमाणात रक्तदान शिबिरास प्रतिसाद दिला. तसेच या निमीत्ताने मोठया संख्येने नागरीकांनी पालघर पोलीस ठाणे अतंर्गत लायन्स क्लब येथे उपस्थीती दर्शवीली होती. रक्तदात्यामध्ये, पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर पोलीस ठाणे, पोलीस मुख्यालय, पालघर येथील पुरुष व महीला पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस पाटील यांनी या कार्यक्रमास हजेरी लावुन २०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. यामध्ये पालघर पोलीस दलातील ५९ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी रक्तदान केले आहे.

**तसेच पालघर पोलीस दलातर्फे खालील ठिकाणी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.**

१) दिनांक ०६/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर यांचे वतीने टीमा हॉल, बोईसर येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

२)दिनांक ०८/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु यांचेमार्फत दशश्री माळी समाज हॉल,मासोली, ता.डहाणु येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

३) दिनांक १०/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार यांचे वतीने वाडा पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी रक्तदात्यांनी रक्तदान करुन सहकार्य करावे ही विनंती.

पालघर पोलीस ठाण्याचे वतीने रक्तादात्यांना व पुष्पगुच्छ देवुन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, श्री.शैलेश काळे, पोलीस उपअधीक्षक गृह, पालघर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री.दशरथ पाटील, सपोनि/गजानन पडळकर, पोउपनि/विनायक माने, पोउपनि/अविनाश ढाकरे, पोउपनि/सुधिर उबाळे, रापोउपनि/कदम व पोलीस अंमलदार यांनी केलेल्या जनजागृती व नियोजनामुळे रक्तदान शिबीर कार्यक्रम यशस्वी पार पडला आहे. पालघर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री.दशरथ पाटील यांनी व त्यांच्या टिमने रक्तदान करणा-या रक्तदात्यांचे आभार मानले आहेत.